**ठळक बातम्या**

- युद्धाचं सावट असलेल्या जगात आध्यात्मिक उन्नतीची गरज इतर कोणत्याही काळापेक्षा अधिक असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पॅरिसमध्ये 'विव्हाटेक २०२६' या शिखरपरिषदेत सहभागी होणार

- महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी मतदान शांततेत सुरु

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने व्हीप जारी करत बोलवलेल्या पक्षाच्या बैठकीला सहा खासदार अनुपस्थित

**आणि**

- सोन्यावरचं आयातशुल्क वाढवल्यावर देशाच्या सोने आयातीत सुमारे ७० टक्के घट

**<><><><><>**

आजच्या भोगवादी आणि चंगळवादी जगात प्रत्येक समुदायाला आध्यात्मिक उन्नती गरजेची असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. त्या आज मध्यप्रदेशात बेतुल इथे आध्यात्मिक जागृतीद्वारे समाजाचं सक्षमीकरण या विषयावरच्या एका कार्यक्रमात बोलत होत्या. सध्याच्या युद्धाचं सावट असलेल्या जगात आध्यात्मिक उन्नतीची गरज इतर कोणत्याही काळापेक्षा अधिक आहे. विकसित भारतासाठी प्रत्येक समुदायाची उन्नती गरजेची असल्याचंही राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**होल्ड.. बाईट - राष्ट्रपती**

मध्य प्रदेशातल्या आपल्या दौऱ्यात त्या उद्या आंतरराष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमातही सहभागी होणार आहेत. तसंच, येत्या रविवारी जबलपूर इथे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमातही त्या सहभागी होतील. त्या

राणी दुर्गावती विद्यापीठाच्या ३६ व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. त्यानंतर, नवी दिल्लीला परतण्यापूर्वी त्या कुनो राष्ट्रीय उद्यानाला भेट देतील.

<><><><><>

फ्रान्स दौऱ्यात, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज फ्रान्समधल्या विविध उद्योगपतींसोबत उच्चस्तरीय बैठक घेणार आहेत. भारत-फ्रान्स यांच्यात आर्थिक आणि उद्योग क्षेत्रातलं सहकार्य वृद्धिंगत करणं हे बैठकीचं उद्दिष्ट आहे.

प्रधानमंत्री मोदी सेंट गोबीनचे मुख्य कार्यकारी अधिकारी बेनोट बेझिन यांच्यासोबत बैठक घेतील, हरित उत्पादन आणि शाश्वत पायाभूत सुविधा या विषयांवर यावेळी चर्चा होईल. त्याचप्रमाणे अल्टस्टॉमच्या कार्यकारी अधिकाऱ्यांसोबतही प्रधानमंत्री चर्चा करतील. रेल्वेच्या आधुनिकीकरणावर या चर्चेत भर दिला जाईल. तसंच मिस्ट्रल एआयचे सह संस्थापक अर्थुर  मेन्श यांच्याबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवोन्मेष याबाबत प्रधानमंत्री चर्चा करणार आहेत. प्रधानमंत्री मोदी फ्रान्स दौऱ्याच्या अंतिम टप्प्यासाठी काल रात्री फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये दाखल झाले. यावेळी भारतीय समुदायाच्या सदस्यांनी त्यांचं उत्साहात स्वागत केलं. या टप्प्यात ते फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत 'विव्हाटेक' या जागतिक संमेलनात सहभागी होतील.

<><><><><>

इ पी एफ ओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी मध्ये २०२५-२६ मधल्या ठेवींवर सव्वा आठ टक्के व्याज देण्याचा निर्णय केंद्रीय अर्थ मंत्रालयानं घेतला आहे. यामुळे सलग तीन वर्ष हा व्याजदर कायम राहिला आहे. याचा फायदा सुमारे सात कोटी ठेवीदारांना होणार आहे.

<><><><><>

झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या बलिदान दिनानिमित्त आज त्यांना अनेक कार्यक्रमांमधून आदरांजली वाहण्यात येत आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी आदराजंली वाहताना समाजमाध्यमावर म्हटलंय, राणी लक्ष्मीबाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाचं मोठ्या धाडसानं नेतृत्व केलं होतं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरींसह अनेक नेत्यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्या बलिदानदिनानिमित्त त्यांना आदरांजली वाहिली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राणी लक्ष्मीबाई यांना अभिवादन केलं आहे.

**<><><><><>**

झारखंडमधली महिला नक्षलवादी पुष्पा महतो हिने शस्त्र खाली ठेवून कोलकाता पोलिसांसमोर शरणागती पत्करली.

पुष्पा महतो झारखंडमध्ये पूर्व सिंगभूम आणि सारंडा भागात सक्रिय होती. जेएमएमचे माजी खासदार सुनील महतो यांची हत्या आणि बुरुडीह येथील भूसुरुंग स्फोट यांसारख्या अनेक घटनांमध्ये तिचा सहभाग होता.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी आज मतदान होत आहे. यात सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशीव- लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांचा समावेश आहे. तर नागपूर मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान होत आहेत. ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या सहा जागांवर प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे महायुतीच्या उमेदवारांचा मार्ग मोकळा झाला आहे. सकाळी आठ वाजता मतदानाला सुरुवात झाली असून सर्व मतदारसंघांमधे मतदानाची प्रक्रिया शांततेत सुरू आहे.

विधानपरिषद निवडणुकीसाठीची मतमोजणी २२ जूनला होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाईल.

**<><><><><>**

मिझोरममधून राज्यसभेच्या एकमेव जागेसाठी आज मतदान होणार असून, सत्ताधारी झोरम पीपल्स मूव्हमेंट आणि विरोधी मिझो नॅशनल फ्रंट यांच्या उमेदवारांमध्ये थेट लढत होणार आहे. भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसनं मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज व्हीप जारी करत बोलवलेल्या पक्षाच्या बैठकीला सहा खासदार अनुपस्थित होते. या बैठकीला खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे यांच्यासह पक्षाचे एकमेव राज्यसभा खासदार संजय राऊत उपस्थित होते. उर्वरित सहा खासदारांच्या अनुपस्थितीमुळे पक्षाच्या संसदीय गटात फूट पडल्याचं जवळजवळ निश्चित झालं आहे. बैठकीला गैरहजर राहिलेल्या खासदारांमध्ये नागेश आष्टीकर, संजय देशमुख, संजय जाधव, संजय दिना पाटील, ओमप्रकाश राजे निंबाळकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांचा समावेश आहे. या सहाही खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातल्या शिवसेनेत सामील होत असल्याचं पत्र लोकसभा सभापती ओम बिर्ला यांना सादर केलं आहे. मात्र, ही प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसून, पडताळणीसाठी काही खासदारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहणं आवश्यक आहे, असं लोकसभा सभापतींच्या कार्यालयाकडून सांगण्यात आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

सोन्यावरचं आयातशुल्क वाढवून १५ टक्के केल्यानंतर देशाच्या सोने आयातीत सुमारे ७० टक्के घट होऊन तिचं प्रमाण २५ ते ३० टनावर आलं आहे. गेल्या १३

मे रोजी सोनं आणि चांदी या धातूंवरचं आयातशुल्क ६ टक्क्यांवरून वाढवून १५ टक्के करण्यात आलं होतं. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा दर अधिक असल्यानं मे महिन्यात सोने आयातीच्या मूल्यात ३४ टक्के वाढ दिसून आली.

**<><><><>**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात लखनौमध्ये काल झालेल्या दुसऱ्या एक दिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं अफगाणिस्तानवर १७० धावांनी विजय मिळवला. शुभमन गिलच्या १५४ आणि ईशान किशनच्या १२५ धावांच्या जोरावर भारतानं ४०२ धावांचा डोंगर रचला. त्याला प्रत्युत्तर देताना अफगाणिस्तान २३२ धावाच करू शकला. शुभमन गिल सामनावीर ठरला.

**<><><><>**

फिफा विश्वचषक फूटबॉल स्पर्धेत ग्रुप के मधे आज मेक्सिको सिटी इथं कोलंबियाने उझबेकिस्तानचा ३-१ असा पराभव केला. ग्रुप एल च्या सामन्यात घानाने पनामावर १- ० अशी मात केली. आर्लिंग्टन मधे झालेल्या सामन्यात इंग्लंडने क्रोएशियाचा ४-२ असा पराभव केला. अर्जेंटिनाने अल्जीरियाचा ३-० असा पराभव करत जोरदार सुरुवात केली. या सामन्यात स्टार खेळाडू लिओनेल मेस्सीने ऐतिहासिक हॅटट्रिक नोंदवत विश्वचषकात सर्वाधिक १६ गोल करण्याच्या मिरोस्लाव क्लोजच्या विक्रमाशी बरोबरी केली असून, तो विश्वचषकात हॅटट्रिक करणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. दुसरीकडे, ग्रुप 'के' मध्ये पोर्तुगाल आणि काँगो यांच्यातील सामना १-१ असा बरोबरीत सुटला. ऑस्ट्रियाने जॉर्डनचा ३-१ असा पराभव केला, तर नॉर्वेने इराकवर ४-१ ने मात केली. आज ग्रुप ए मधे झेकियाचा सामना दक्षिण आफ्रिकेशी तर मेक्सिकोचा सामना दक्षिण कोरियाशी होणार आहे.

**<><><><>**

एफआयएच महिला हॉकी स्पर्धेत भारताच्या संघाने उरुग्वेवर ३-२ अशी मात केली. न्यूझीलंडमधे सुरु असलेल्या या स्पर्धेत भारताचा हा सलग तिसरा विजय असून अ गटात भारत अग्रस्थानी आहे. भारताचा उपान्त्यफेरीत सामना चिली विरुद्ध कोरिया सामन्यात जिंकणाऱ्या संघाशी  येत्या शनिवारी म्हणजे २० जूनला होईल.

<><><><><>

अन्नपदार्थांशी निगडीत सर्व व्यावसायिकांना हाताळणी आणि इतर प्रक्रियेसाठी फक्त सुरक्षित आणि गंजरोधक सुऱ्या, ब्लेड्स तसंच इतर साधनं वापरण्याचे निर्देश FSSAI अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने दिले आहेत. काही व्यावसायिक अन्न हाताळणी आणि प्रक्रियेदरम्यान, गंजलेली, खराब झालेली सुरी वापरताना आढळले आहेत.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे बंडखोर आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेते  म्हणून नेमणूक करण्याच्या  सभापती रथींद्र बोस यांच्या निर्णयाला अंतरिम मनाई करण्यास कलकत्ता उच्च न्यायालयानं नकार दिला आहे. याप्रकरणी उमेदवारी नाकारण्यात आलेले तृणमूलचे आमदार शोभनदेव चट्टोपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली आहे..  यापुढची सुनावणी २८ जुलैला होणार आहे.

//<><><><><>//